# प्रेस नोट दि. १७/११/२०२१

## पोलीस प्रशिक्षण केंद्र, नानवीज-दौंड ने पटकविले उत्कृष्ठ प्रशिक्षण केंद्राचे राष्ट्रीय पातळीवरील रौप्य पदक

नवी दिल्ली येथील **'SKOCH GROUP '** या संस्थेव्दारे सन- २०२१ चे ७६ वे **'SKOCH AWARDS '** दिनांक १६/११/२०२१ रोजी जाहीर झाले असून त्यामध्ये पोलीस प्रशिक्षण केंद्र, नानवीज-दौंड या प्रशिक्षण केंद्रास **' Police and Safety '** या प्रकारातील **' Improvement in Performance by Improving Quality of Training '** या सदराखालील उत्कृष्ठ कामगिरी करीता **राष्ट्रीय पातळीवरील रौप्य पदकाने** गौरविण्यात आले आहे.

मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई व मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली तत्कालीन प्राचार्य श्री. सदिप आटोळे यांनी पोलीस प्रशिक्षण केंद्र,नानवीज मधील नाविन्यपूर्ण उपक्रमाबाबत व गुणवत्तापुर्वक प्रशिक्षणाबाबत प्रस्ताव तयार करुन नवी दिल्ली येथील **'SKOCH GROUP '** या संस्थेस सादर केला होता. सदर प्रस्तावाबाबत पोलीस प्रशिक्षण केंद्रातर्फे पोलीस निरीक्षक, श्री. शंकर काळे यांचे मार्फत ऑनलाईन सादरीकरण करण्यात आले होते. सदर पारितोषिक पटकविण्यात पोलीस प्रशिक्षण केंद्राचे तत्कालीन प्राचार्य श्री. संदिप आटोळे यांचे नेतृत्वात पोलीस निरीक्षक, श्री. शंकर काळे , पोलीस हवालदार श्री. दिपक संकपाळ व पोलीस शिपाई श्री. निलेश थोरात तसेच अन्य अधिकारी, अंमलदार व कर्मचारी यांनी मोलाची भुमिका पार पाडली आहे.

पोलीस प्रशिक्षण केंद्र, नानवीज-दौंड हे पुणे जिल्ह्याच्या मुख्यालयापासून दुर ग्रामीण भागात स्थित आहे. तसेच येथे सोईसुविधांची देखील कमतरता आहे. तरी देखील सदर परिस्थितीवर मात करुन **राष्ट्रीय पातळीवरील उत्कृष्ठ प्रशिक्षण केंद्राला दिले जाणारे व्दितीय पारितोषिक (SILVER MEDAL )** पोलीस प्रशिक्षण केंद्र, नानवीज-दौंड ने **प्रथमच पटकविल्याबद्दल** प्रशिक्षण केंद्रातील सर्व पोलीस अधिकारी, अंमलदार, मंत्रालयीन व वर्ग -४ कर्मचारी यांच्यामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. सदर उपलब्धी बद्दल पोलीस प्रशिक्षण केंद्रातील सर्व पोलीस अधिकारी, अंमलदार, मंत्रालयीन व वर्ग -४ कर्मचारी यांचे प्राचार्य श्री. रामचंद्र केंडे यांनी अभिनंदन केले आहे.

**प्रत,**

**मा. संपादक,**

सकाळ, पुढारी, लोकमत, लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स, पुण्य नगरी.

कृपया वरील प्रेस नोट आपले वर्तमानपत्रात छापून सहकार्य करावे ही विनंती.

# SKOCH AWARD

## POLICE & SAFETY

### SILVER

**POLICE TRAINING CENTRE, NANVEEJ-DAUND**

FOR

**IMPROVEMENT IN PERFORMANCE BY IMPROVING QUALITY OF TRAINING**

CONFERRED THIS HONEST INDEPENDENT HONOUR IN INDIA ON 16TH NOVEMBER 2021 AT NEW DELHI

SAMEER KOCHHAR
CHAIRMAN, SKOCH GROUP

WWW.SKOCH.IN